आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ३३० वा ● मंगळवार दि. १० जून २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## पुण्यात सुरु केलेला महसूल लोकअदालत उपक्रम राज्यात राबविणार - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

पुणे : जिल्ह्याने सुरू केलेल्या महसूल लोक अदालतीमुळे महसूली दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात निकाली निघणार आहेत. त्यामुळे ही सर्वसामान्यांना न्याय देणारी महसूल लोकअदालतीची मोहीम यापुढे राज्यभरात राबविली जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.

पुणे येथे झालेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील ६ विभागीय आयुक्तांना महसूल विभागाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने काही जबाबदाऱ्या दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यात मंत्रालय ते नायब तहसील पातळीवर मोठ्या प्रमाणावर म्हणजेच १३ लाखावर महसूली दावे प्रलंबित आहेत. ती प्रकरणे कशी संपतील यासाठी महसूल लोक अदालतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच पक्षकार आणि वकीलांचे सहकार्य घेण्यात येईल.

महसूल विभाग हा राज्याचा चेहरा आहे. वेळ आणि पैशाची बचत, मैत्रीपूर्ण न्यायव्यवस्था निर्माण करण्याकरिता, स्वखुशीने तडजोड निर्माण करण्याची व्यवस्था, महसूल व्यवस्थेवरील ताण कमी करणे आदी काम या महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून झाले आहे. महसूल विभागात मोठ्या प्रमाणात पारदर्शकता आणण्यात येत आहे. विभागातील मागील २५ वर्षापासून प्रलंबित असलेले विषय शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.



पुणे जिल्ह्याने सादरीकरण केलेल्या बाबींच्या अनुषंगाने विविध शासन निर्णय काढण्यात येणार असून त्यामुळे राज्याच्या महसूलात २० हजार कोटींची वाढ होईल. ई-फेरफार प्रणालीच्या अनुषंगाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्रकाचे राज्यभरात अभिनंदन झाले असून या परिपत्रकाप्रमाणे अंमलबजावणीसाठी शासन निर्णय करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

राज्य शासनाने नवीन वाळू धोरण आणले असून 'एम-सँड'म्हणजेच दगडापासून केलेली वाळू बांधकामात वापरली जाईल. त्यादृष्टीने शासकीय, खासगी जागा उपलब्ध करून देऊन क्रेशर उभारण्यात येतील. महाखनिजच्या माध्यमातून ऑनलाईन संनियंत्रण करून मागणीप्रमाणे वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. जेणेकरून बुडणारा महसूल वाचण्यासह नदीच्या वाळूवरुन होणारे गैरप्रकार बंद होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानासाठी ज्याप्रमाणे जिल्हा वार्षिक योजनेतून निधी दिला त्याप्रमाणे महसूल लोक अदालतीला द्यावा, महसूल विभागाला अत्याधुनिक मल्टीपर्पज वाहने मिळाल्यास विभागाच्या कामाला गती येईल, असेही ते म्हणाले.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी यांनी महसूल लोक अदालतीच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. ते म्हणाले राज्यातील मोठ्या प्रमाणात प्रलंबित महसूल प्रकरणांबाबत उपाययोजना करण्याच्या मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने पुढाकार घेऊन ही लोक अदालत आयोजित केली आहे. जिल्ह्यात मंडल अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, अपर जिल्हाधिकारी स्तरावर ३१ हजारावर महसूली प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी ११ हजार ५८९ प्रकरणे या अदालती मध्ये ठेवण्यात आली आहे. यापुढेही दर तीन महिन्यांनी महसूल लोक अदालतीचे आयोजन करून दाव्यांची संख्या ३१ हजारावरून १० हजारापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या ईक्यूजे कोर्ट, ई- हक्क प्रणाली, ई- फेरफार नोंदणी, पानंद रस्ते खुले करण्याची मोहीम, नाविन्यपूर्ण असा सेवादूर उपक्रम आदींची माहिती दिली. महाखनिज व बांधकाम परवानगी एकात्मिक प्रणालीवर आणल्यामुळे १५० कोटी रुपयांच्या महसूलात वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महसूल लोक अदालतीत निकाली निघालेल्या प्रकरणातील पक्षकारांना प्रातिनिधीक स्वरुपात निकालपत्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी वकील आणि पक्षकार यांनी प्रातिनिधीक स्वरुपात मनोगत व्यक्त केले.

अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी आभार व्यक्त केले.

## लातूर जिल्हा रुग्णालयाच्या भूमिपूजनासाठी आरोग्यमंत्र्यांची भेट

कोल्हापूर –कोल्हापूर येथे भारतीय



जनता पक्षाच्या नेत्या व लातूरच्या कार्यसमर्थ नेत्यांपैकी एक, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा.ना. श्री. प्रकाशजी आबिटकर यांची विशेष भेट घेतली.

या भेटीचा प्रमुख उद्देश लातूर शहरात मंजूर झालेल्या १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन लवकरात लवकर व्हावे यासाठी मागणी करणे हा होता. संबंधित रुग्णालयासाठी लातूर येथील कृषी महाविद्यालयाच्या सर्वे नं. ३७/१ मधील १० एकर जमीन दिनांक २२/०५/२०२५ रोजी महसूल विभागामार्फत अधिकृतरित्या ताब्यात घेण्यात आली आहे, हे नमूद करणे आवश्यक आहे.

या सोबतच महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, जी राज्य शासन मान्यता प्राप्त संघटना आहे, यांच्यामार्फत राज्यातील परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन प्रलंबित मागण्यांविषयीही डॉ. चाकूरकर यांनी मंत्री महोदयांकडे ठामपणे निवेदन सादर केले.

मा. आरोग्यमंत्री प्रकाशजी आबिटकर यांनी दोन्ही विषयांवर सकारात्मक प्रतिसाद देत,९ लातूर जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन लवकरच करण्यात येईल व प्रत्यक्ष बांधकामाला सुरूवात केली जाईल असे आश्र्वासन दिले.

९ परिचारिका संघटनांच्या मागण्यांचा योग्य त्या पातळीवर विचार करून निर्णय घेतला जाईल, अशी हमी देखील त्यांनी दिली.

ही भेट लातूरकरांसाठी आणि आरोग्यसेवा क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण व आश्र्वासक ठरली आहे

## सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

मुंबइ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य



विभागामार्फत सन २०२३-२४ या वर्षासाठी राज्यभरातून एकूण १३० सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण १० जून २०२५ रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे यशस्वी आयोजन होण्यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनाप्रमाणे काम करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सामाजिक न्याय विभागाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याच्या नियोजनाचा आढावा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे घेतला. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. शिरसाट म्हणाले, हा पुरस्कार वितरण सोहळा प्रेरणादायी ठरावा यासाठी प्रत्येक बाबीकडे बारकाईने लक्ष द्यावे. कामाच्या नियोजनाप्रमाणे आराखड्याची अंमलबजावणी करावी व दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.

मंत्री संजय शिरसाट यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था, स्वच्छता, वाहनतळ व्यवस्था, आरोग्य व्यवस्था आदींचा आढावा यावेळी घेतला.

## बंदरांच्या ठिकाणी सुरू असलेली विकासकामे गती व पारदर्शकतने पूर्ण करा - मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

मुंबई :- कारंजा, आनंदवाडी, लिलाव शेड, बर्फ कारखाना, वर्कशॉप,



मिरकरवाडा व ससून डॉक येथील बंदरे ही कोकणाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असून यातून तेथील लोकांच्या आर्थिक विकासास चालना मिळेल. या बंदरांच्या ठिकाणी सुरू असलेली विकासकामे गती व पारदर्शकतेने पूर्ण करा, अशा सूचना मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाची आढावा बैठक मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीला विभागाचे आयुक्त किशोर तावडे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश पाठक, उपसचिव श्री. जकाते, सह आयुक्त दिनेश देवरे, प्रादेशिक उपायुक्त प्रकाश भादुले यासह विभाग व महामंडळातील अधिकारी उपस्थित होते.

मंत्री राणे यांनी महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाच्यावतीने सुरू असलेल्या बंदरांचा विकास व आधुनिकीकरणाच्या कामांचा आढावा घेतला. यामध्ये मुंबई शहरातील ससून डॉक, रायगड जिल्ह्यातील कारंजा (उरण), सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आनंदवाडी व रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा येथील बंदरांच्या विकासकामांची माहिती घेतली.

येथील बंदरांच्या ठिकाणी मासे मासेमारीच्या जाळ्यांची दुरुस्ती व निगा राखण्यासाठी शेड, प्रसाधनगृह यांसह विविध काम केली जात आहेत. सध्या सुरु असलेल्या कामांसाठी ससून गोदी मच्छीमार बंदर येथील विकास कामांसाठी ९२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, आनंदवाडी येथील विकासकामांसाठी ८८ कोटी ४४ लाख रुपये, मिरकरवाडा येथील विकासकामांसाठी २६ कोटी २३ लक्ष रुपये, कारंजा येथील विकासकामांसाठी १४९ कोटी ८० लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कोकणातील सात ठिकाणी होत असलेल्या मासे उतरवणी केंद्रातील कामांचा देखील यावेळी आढावा घेण्यात आला.

महाराष्ट्र सागरी मच्छिमार कल्याणकारी महामंडळ आणि महाराष्ट्र भूजलाशय मच्छीमार कल्याणकारी महामंडळ यांची घोषणा राज्य शासनाने ऑक्टोबर २०२४ मध्ये केली आहे. यासाठी मुंबई व नागपूर येथील कार्यालयातील सध्याच्या कार्यरत यंत्रणेमार्फत काम केले जावे. या दोन्ही महामंडळाचे कामकाज तातडीने सुरू होण्यासाठी विभागाने कार्यवाही करावी, असे आदेशही मंत्री राणे यांनी यावेळी दिले.

## 'शिवसृष्टी' निर्मितीसाठी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

रायगड (जिमाका) – छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचार व आचार आदर्श मानून राज्य सरकारची वाटचाल सुरु आह. पाचाड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याची माहिति देणारी भव्य दिव्य शिवसृष्टी उभारली जाणार असून, त्यासाठी सरकारकडून सर्व प्रकारची मदत केली जाईल. अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५२ वा राज्याभिषेक दिन सोहळा आज जेष्ठ शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी दुर्गराज रायगडवर मोठया उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योग मंत्री उदय सामंत, रोहयो मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री योगेश कदम, खा. श्रीरंग बारणे, आ. महेंद्र थोरवे, जिल्हाधिकारी किशन जावळे,पोलीस अधीक्षक आचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, यांच्यासह कोकण कडा मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार, कार्याध्यक्ष नितिन पावळे आदी मान्यवर आणि मोठ्या संख्येने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले शिवभक्त उपस्थित होते.

सर्वप्रथम शिवराज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले ही पवित्र भूमी शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. ३५२ वर्षांपूर्वी जर शिवराज्याभिषेक झाला नसता, तर आज आपण इथे नसतो. त्यांच्या दूरदृष्टी मुळे स्वराज्याचा पाया घालण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांनी जात-पात, धर्म, वर्ण या पलीकडे जाऊन रयतेचे राज्य प्रस्थापित केले. त्यामुळे ते फक्त महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे राष्ट्रनायक आहेत. पाकिस्तान बाबत जी भूमिका प्रधानमंत्री मोदीजींनी घेतली आह त्यामागे देखील छत्रपती शिवाजी महाराज यांचीच प्रेरणा आह असेही त्यांनी सांगितले.

काळ कितीही पुढे गेला आणि आपण कितीही तंत्रज्ञानाच्या गोष्टी केल्या तरी शिवाजी महाराजांचा वारसा आपण कुणीच विसरू शकणार नाही असे सांगून उपमुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले राज्यशासनाने गडकोट किल्ले आणि मंदिरांचं जतन, संवर्धन करण्याचा निर्णय घेतला आह.

छत्रपती महाराजांची, स्वराज्याची ओळख नव्याने करुन देण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन आपण पर्यटनाला चालना देतो आह. त्यासाठी भारत गौरव यात्रेच्या' माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरु केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ट्रेनला आज हिरवा कंदील दाखवला असून या विशेष रेल्वे च्या माध्यमातून नागरिकांना ऐतिहासिक किल्ले आणि गडकोट पाहता येणार आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना राज्याचे रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी पेहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयातील ऑपरेशन सिंदूर मध्ये सहभागी वीर सैनिकांना मानवंदना दिली. त्यांनी शिवसृष्टीसाठी सरकारने मंजूर केलेल्या ५० कोटी रुपयांच्या निधीबाबत आराखडा तयार असून लवकरच काम सुरु होणार असल्याची माहिती दिली. वारा, पाऊस, ऊन याची तमा न बाळगता स्वखर्चाने रायगडावर येऊन दोन दिवस सतत सेवा करणाऱ्या सर्व शिवभक्तांचे त्यांनी आभार मानले.

शिवराज्याभिषेक सोहळ्यात प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांना रायगड पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली.

या सोहळ्याच्या निमित्ताने विविध शाहिरी कार्यक्रम, लोकनृत्ये, युद्धकला सादरीकरणे आणि मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक यामुळे रायगडावर शिवकाल अनुभवण्याचा अद्वितीय क्षण उपस्थितांना लाभला.

# स्वबळातून मैत्रीपूर्ण लढत ?

## संपादकीय...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणारच हे निश्चित झाल्याने जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका नगरपरिषदा, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतच्या निवडणुका या प्रत्येक राजकीय पक्षासाठी महत्त्वाच्या असतात. या निवडणुकीत यशावरच त्या त्या पक्षाचे विधानसभा, लोकसभा निवडणुकीतील भविष्य ठेवलेले असते, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जो पक्ष आघाडीवर राहील तोच पक्ष सत्ता संघर्षात निपुण ठरत असतो. त्यापुढे काँग्रेस, भाजपा, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, दोन्ही शिवसेना आणि जनता दलाचे तिन्ही गट, शेकाप, माकप, भाकप सह इतर गुडघ्याला बाशिंग बांधून असलेले बंडखोर ते राजकीय सामाजिक संघटना, मराठा समूहातील त्या त्या क्रांतिकारी वगैरे संघटना, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आपापले नशीब आजमवणारच झाले, यात शंका नसावी. तरी सत्ताधारी, विरोधी, राजकीय पक्षाची मात्र या निवडणुकीत कमालीची चुरस असणार आहे, असे कुजबूज राजकीय वर्तुळात होते आहे.

महाराष्ट्रात प्राथमिक दृष्ट्या सत्ताधारी भाजपा, सेना, राष्ट्रवादीत स्वबळाची भाषा वापरली जात असली तरी, फडणवीस, शिंदे, पवार यांचे जे विभाग, बालेकिल्ले म्हणून ओळखले जातात, तिथे भाजपा, काँग्रेस आणि शरद पवार यांची ताकद नाही असे नाही, त्यामुळे काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला एकत्रित लढल्याशिवाय पर्याय नाही. तसाच फडणवीस, शिंदे, अजित दादांना दुसरा विकल्प नाहीच नाही. तरी स्वबळाची भाषा वापरली जात असल्यानेच राजकीय वर्तुळात कुतकुलाची निवडणुकीच्या राग, रंगाची कुजबूज होताना दिसते ती नजरेआड करण्यासारखी नसावी असे वाटते.

एक गाव, बारा भानगडी प्रमाणेच एक पक्ष १२ नेते, १२ गट, १२ वाटा, पळ वाटा त्यातून निष्ठा आणि साम-दाम-दंड भेदाची ताकद यावरच पक्ष हित आणि यश अवलंबून असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात पक्ष नेत्यांचे आदेश हे नाव आणि कागदापुरते आणि थोडेफार वृत्तपत्रापर्यंतचे मर्यादित असल्याने १२ पक्षाचे बाराशे नेते, कोणती व्युव्हरचना, रणनीती आखतील त्यावर सारे काही अवलंबून असल्याची कुजबूज राजधानीत रंगाला आल्याचे बोलले जात आहे.

विशेष म्हणजे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे मनोमिलन शरद पवार आणि अजित दादा एकत्रित येण्याचा अंदाज, त्या भाजपाचा स्वबळासह मित्रासह लढत आणि एकनाथ शिंदे यांची फडणवीस, शिंदे, अजित दादा एकत्रित लढणार असल्याची आरोळी, यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात कोण बाजी मारेल याकडेच प्रसार माध्यमाचे लक्ष वेधून असेल एवढेच.

# जागतिक नेत्रदान दिन

१० जून, आजचा दिवस संपूर्ण



जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# वर्षा ठाकुर घुगे:दांडगा जनसंपर्क, उत्तम प्रशासक विकासाभिमुख जिल्हाधिकारी

नवनिर्मितीचे बीजांकुर आपल्या उदरात ठेवून नव्या जीवनाला आयुष्य देणारी प्रत्येक महिला ही 'फर्स्ट लेडी' असते. कारण प्रत्येक वेळी आपले आयुष्य पणाला लावून ती नवजीवन देते. स्त्रियांनी आज जवळजवळ सर्वच क्षेत्रे काबीज केली आहेत. ज्या क्षेत्रांमध्ये पुरुषवर्गच मोठ्या प्रमाणात कार्यरत असायचा अशा क्षेत्रांमध्येही स्त्रियांनी आपली सहभाग नोंदवून इतिहासाला नवी दिशा दिली. हा इतिहास घडवणाऱ्या महिलांचा प्रवास थक्क करणारा आहे.



महिलांमध्ये अंगभूत शक्ती सर्जनशीलता आणि असामान्य कर्तृत्व गाजवण्याची क्षमता अपार आहे.महिलांना कर्तृत्व गाजवण्याची संधी मिळाली की त्या संधीचे सोने करतात हे वेगळे सांगायची गरज नाही. त्याप्रमाणेच लातूर जिल्ह्याच्या इतिहासात व महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी म्हणून कामाच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण केलेल्या कर्तृत्ववान जिल्ह्यधिकारी वर्षा ठाकुर -घुगे.....

मला भावलेला एक असामान्य व्यक्तिमत्व...

परिदों को मंजिल मिलेगी यकीनन
ये फैले हुए उनके पर बोलते है
अक्सर वो लोग खामोश रहते है
जमाने मे जिनके हुनर बोलते है..

अशा व्यक्तीमत्वाचा आज १० जून रोजी जन्मदिन.त्या औचित्याने सजग प्रशासक जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रसिद्ध वक्ते संवादतज्ञ उध्दव बापु फड यांनी केला आहे..

वर्षा ठाकूर यांचा जन्म १० जून चा. त्यांच्या ४०-५० वर्षांच्या काळातील त्यांची वाटचाल माणूस म्हणून ,व्यक्ती म्हणून, सनदी अधिकारी म्हणून अतिशय दमदार, कार्यनिष्ठ आणि संवादी राहिली आहे. प्रत्येक माणसाचं एक व्यक्तित्व असतं. एक स्वतःची ओळख असते. तशीच वर्षा ठाकूर घुगे यांची आहे.

वर्षा ठाकूर-घुगे हे नावच काफी आहे. या नावात एक सकारात्मकता आहे. हीच सकारात्मक ऊर्जा त्यांच्या संबंध आयुष्याच्या वाटचालीत दिसून येते. कुठल्याही आयएएस अधिकाराच्या जीवनात डिस्ट्रिक्ट कलेक्टर - जिल्हाधिकारी पद अत्यंत महत्वाचं समजल्या जातं. हे पद जितकं मानाचं, सन्मानाचं असतं, तितकंच ते जबाबदारीचं असतं. आपल्या लोकाभिमुख, अभिनव कल्पना, उपक्रम अधिकारी या पदावर राबवू शकतात. अशा या जिल्हाधिकारी पदावर त्यांनी जूलै २०२३ रोजी लातूर येथे सूत्र हाती घेतली

आपल्या कार्याप्रती प्रचंड निष्ठा आणि हाती घेतलेले काम नेटाने पूर्ण करायचे त्यासाठी संवाद सूत्र प्रभावीपणे वापरून कार्यक्षमतेतून गतीमान प्रशासन देणाऱ्या लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे आहेत.

वर्षा ठाकूर-घुगे यांचा प्रशासकीय दिनक्रम पहाटे चार ते रात्री १२ -१ पर्यंत असतो. सतत प्रशासकीय चिंतन करून त्यावर मार्ग शोधण्याचा त्यांचा ध्यास त्यांच्या सहृदयी व्यक्तिमत्त्वातून दिसून आला आहे. आठ ते दहा तास नॉनस्टॉप बैठका, नॉन स्टॉप आढावा पाहताना त्यांच्या स्मरणाबद्दल चकित व्हायला होतं .

सामान्य माणूस केंद्रस्थानी माणून सुसंवादी आणि डेडलाईनमध्ये नियोजनबद्ध काम करण्याची त्यांची वृत्ती आहे. त्या सतत आव्हान लीलया पेलण्याच्या सहज वृत्तीत आणि हसतमुख असतात. म्हणून एका गतीचं किंबहुना एका उत्कृष्ट प्रशासनतत्वाचे नाव वर्षा ठाकूर-घुगे आहे.

लातूर जिल्हाभर झंजावाती दौरे, बैठका कामाचे योग्य नियोजन करून जिल्ह्याचे रूप एक उत्कृष्ट जिल्हा म्हणून तयार करण्यसाठी मनापासून प्रयत्न करत असतात...

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी लातूर जिल्ह्यात विविध उपक्रम राबवले आहेत.

लातूर जिल्हयाच्या ४० वर्षाच्या इतिहासात व महाराष्ट्रात एकाही जिल्हाधिकारी यांच्या काळात झाले नसतील ऐवढे विकासाभिमुख उपक्रम व महत्वपूर्ण कामे झाली आहेत.यात.लातूर जिल्हात त्यांनी वृक्षारोपण मध्ये माझं लातूर हरित लातूर अंतर्गत गेल्या दिड वर्षात ३५ लाख झाडांची लागवड केली.स्वच्छता अभियान (उश्रशरप खपवळर चळीीळेप), लोकसभा व विधानसभा निवडणुका, मतदान टक्का वाढण्यासाठी मतदार जागृती अभियान, 'कॉफी विथ कलेक्टर', बेरोजगार यांच्या साठी मराठवाडा महारोजगार मेळावा महासंसस्कृती महोत्सव,१०० वे अखिल भारतीय नाट्य संमेलन, राष्ट्रपती दौरा,जिल्हा विकास निर्देशांक, संविधान दिन आणि गुणवत्तापूर्ण कामासाठी प्रशिक्षण,गाळमुक्त धरण,गाळ युक्त शिवार अभियान,१०० दिवस कार्यक्रम १०० दिवसांच्या शासकीय सुधारणांमध्ये जिल्हाधिकारी यांच्या नियोजनातून लातूर जिल्ह्याला यश मिळाले.लातूर जिल्ह्यातील २२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध विभागांतील उत्कृष्ट कामगिरीसाठीशासनांकडून गौरवण्यात आले - महसूल, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, कारागृह, पशुसंवर्धन, माहिती, सामाजिक न्याय आणि अनेक इतर क्षेत्रांतील सशक्त योगदान!

कामगिरीतून मिळालेला सन्मान लातूरचा अभिमान!ही केवळ पुरस्कारांची यादी नाही, तर लातूर प्रशासनातील प्रेरणादायी कार्यसंस्कृतीची जिवंत झलक आहे. लातूर जिल्ह्याने जिल्हा विकास निर्देशांकात पहिला क्रमांक पटकावला आहे! हा केवळ एक क्रमांक नाही, तर लातूरच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा, कष्टाळूपणाचा आणि प्रगतीसाठीच्या अविरत धडपडीचा सन्मान आहे.

विकासाच्या १२ महत्त्वाच्या आधारस्तंभांवर उभारलेला हा यशाचा किल्ला - आर्थिक मजबुती, औद्योगिक विस्तार, रोजगार निर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, भक्कम पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण यांसारख्या घटकांनमूळे हा सन्मान संपादन केला आहे. शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची नोंदणी, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गृहनिर्माण, दरडोई वीज वापर, आरोग्य सुविधा आणि कायदा-सुव्यवस्थेतील प्रगती - हे सर्व दाखवते की लातूर भरभराटीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.

ही केवळ एका व्यक्तीची किंवा संस्थेची ओळख नाही, तर संपूर्ण लातूरवासियांची , लोकप्रतिनिधी समवेत जिल्ह्याच्या सामूहिक मेहनत आणि समर्पणाची फलश्रुती आहे. महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालय, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे आणि लोकसत्ता समूहाच्या अभ्यासपूर्ण संशोधनाने विकासाचा स्पष्ट मार्ग आखून दिला.

पण या सगळ्यात खरा विजय आहे लातूरकरांचा कॉपीमुक्त परीक्षा पॅटर्न लातूर जिल्ह्यात १०० केंद्रांवर बारावीची परीक्षा व ३७,०६२ विद्यार्थी सहभागी झाले. परीक्षेच्या सुरळीत आणि कॉपीमुक्त आयोजनासाठी १०० बैठे पथके, ९० भरारी पथके आणि सीसीटीव्ही देखरेख ठेवण्यात आली आहे. कंट्रोल रूममधून परीक्षा केंद्रांशी व बैठे पथकांशी संवाद साधत सतर्कतेच्या सूचना दिल्या. तसेच विविध परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या.

यांसारखे उपक्रम राबवले आहेत. कामाच्या जोरावर मिळालेले पुरस्कार

खप्रशासकीय सेवेतील योगदानाबद्दल मराठवाडा समन्वय समितीमार्फत १७ सप्टेंबर, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मराठवाडा भूषण पुरस्कार -२०२४ पुणे बालगंधर्व नाट्य मंदिर येथे मला प्रदान करून गौरविण्यात आले.

खलोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल लातूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचा राज्यस्तरीय उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कार २०२५

ख. मानव विकास निर्देशांक पुरस्कार २०२३-२४: लातूर जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकात (कऊख) उल्लेखनीय योगदानाबद्दल लोकसत्ता कडून प्रदान.

खराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार: स्कोच पुरस्कार (राष्ट्रीय स्तरावर): दिव्यांग समुदायासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल.

खसैनिक कल्याण निधी संकलन पुरस्कार: महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांच्या हस्ते राजभवन येथे प्रदान.

खविकास कामगिरी-आधारित मान्यता-२०२४-२५: गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स (पुणे) कडून 'जिल्हा निर्देशांक' उपक्रमात अव्वल क्रमांक: लोकसत्ताच्या 'जिल्हा निर्देशांक' उपक्रमाचा भाग म्हणून, लातूर जिल्ह्याने विविध विकास निर्देशांकांमध्ये पहिला क्रमांक पटकावला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आणि या कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना सन्मानित करण्यात आले.

अशा अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.अजातशत्रु मनमिळाऊ दांडगा जनसंपर्क असलेल्या व्यक्तीमत्वाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**संवादतज्ञ**
**उध्दवबापु फड**
**९७६५५८८८००**

# झरोका

एक - रॉयल चॅलेंजर्स संघाने आयपीएल क्रिकेट स्पर्धा जिंकली, त्यांत ज्या कोणाचा हकनाक बळी गेला हे दुर्दैवीच, पण या खेळाडूचा सत्कार होतो कशासाठी, कोणाच्या फायद्यासाठी खेळताना कोणाचा तरी तोटा होतोय, क्रिकेटपटू खेळतात, कोणी जिंकतात, कोणी हरतात, पैशाचा चुराडा होतो, स्पर्धक, संघ मालामाल होतो आणि हाकणात अपराधी नसलेले निरपराधी बळी जातात, मृतांना सरकार मदत जाहीर करते, तसे क्रिकेटपटूंनाही लाखो रुपये देते, हा क्रिकेट खेळ म्हणजे काय हेच कळत नाही. डोकं बधिर झालंय.

दुसरा - क्रिकेट वगैरे खेळातून सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्राला बळकट येते, राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाते. राज्य, राज्यांत, देश, परदेशातील आपुलकी, जिव्हाळा निर्माण होतो. म्हणून क्रिकेटला अधिक महत्त्व असते ते तुला कळणार नाही.

एक - अहो, निष्पाप नागरिकांचा त्या विजयी मिरवणुकीत चेंगराचेंगरीत जीव गेला त्याचे काय, कसले सामाजिक ऐक्य, आणि राष्ट्रीय एकात्मता घेऊन बसलात. कोण आहेत त्या संस्था स्वतःच्या फायद्यासाठी क्रिकेट स्पर्धा घेतात. संस्थासह, सरकारकडूनही क्रिकेटपटू पैसे लुबाडतात. त्यांना समाजाचे काय देणे घेणे. दुष्काळात, कोरोना काळात हे क्रिकेटपटू कोठे असतात. कसला शहाणपणा शिकविता हे तुम्हीच बघा समजले.

दुसरा अरे अशा स्पर्धेतून राज्याचे भारताचे नाव होते गैर अर्थ काढू नकोस कला क्रीडा साहित्य हे समाज परिवर्तनाचे एक स्त्रोत एक मार्ग दिशा आहे तुला समजले समजले अवघड आहे शांत बस्स.

एक - अहो, काहीतरी सांगू नका, तो निवृत्त झाला हा आला त्याने जीव घेतला तू कोण आहे, सचिन तेंडुलकर त्याला त्या बिनडोक सरकारने भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले, त्याची काय लायकी आहे. असावी अब्जावधी कमवून बसला, त्या मुंबईच्या बकाल वस्तीत जाऊन तेथील नागरिकांची त्याने विचारपूस तर केलीच काय आणि म्हणता राष्ट्रीय एकात्मता असले दावे बंद करा, तरच सरकार टिकेल अन्यथा...?

# काय बोलता राव ?

भारत आणि चीन दरम्यान व्यापारी करारानुसार संबंध सुधारत असताना भारत पाकिस्तान संदर्भातील ताण, तणाव, संघर्ष, पहलगाम प्रकरणी पाकिस्तानला वेठीस धरण्यासाठी जगभराच्या दौऱ्यावर गेलेल्या शिष्टमंडळातील काँग्रेसने ते शशी थरूर यांनी भारत पाकिस्तान संदर्भात चीन कडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे आवाहन थरून यांनी केले मग आता...!

## काय बोलता राव !

अरे, भारत चीनचे व्यापारी व्यावहारिक संबंध सुधारत आहेत परराष्ट्र धोरणानुसार प्रगती होत आहे. परंतु पहेलगाम दहशतवादी हल्ला प्रकरणी चीन सरकार लष्कर चक पाकिस्तान बरोबर होते. नेहमीच पाक चीनच्या सीमेवर कुरापती होत असतात, त्यात पाकिस्तानला संरक्षण साहित्य पुरविण्यात चीन अवल आहे. वाघेकडील ८१% संरक्षण साहित मग असा चीन पासून सावध राहिलेच पाहिजे ही अशी थरूर यांची भावना रास्तच आहे त्यात शशी थरूर यांचे हे विधान भारतातून नव्हे तर वॉशिंग्टन अमेरिकेतून केलेले आहे ते लाचे लोचेपणाचे नव्हे समजलं मग बोला दाजीबा.



## उपवास..

वट पौर्णिमा आली
दिवस वेगळा न्यारा
पत्नी घाली साकडे
हाचि मिळो बकरा

नटून थटून तयार
वडाला गुंडाळे दोरा
निमीत्तसेखी भेटती
उत्साहे उत्सव दोरा

नटली कशी आनंदे
पहावा तिचा नखरा
वट वृक्ष रोपण करी
जाणे सणअर्थ खरा

दिवस भर उपवास
उतरला तिचा चेहरा
खुशीत दिसते परंतु
भुकेने येतात चकरा

धर्म आणि शास्त्राचा
समन्वय साधते बरा
नव युगाची महिला
मुकुटी मानाचा तुरा

मी ही केला उपवास
कळला प्रकार खरा
नवस मागतो देवला
मीचं हीचा हो नवरा

## संरक्षण ..

वट पौर्णिमेचा सण
गाई सावित्रीचे गुण
आणले यमा कडून
सत्य वाहनाचे प्राण

हेचि निमित्त साधून
करती वडाचे पुजन
वृक्ष हेचि जाण धन
करावे वृक्ष संवर्धन

वृक्ष देई ऑक्सिजन
सुखी होई प्राणीजन
यम धर्म सांगे मर्म
खरअर्थ घेई जाणून

नश्वर शरीर जीवन
अटळनिश्चित मरण
जगा सुख चारक्षण
करावे वृक्ष संरक्षण

निमित्तहोई कोरोना
अनुभवले कटू क्षण
कळला मर्म धर्म ही
जाणवे सणाचे ऋण

नारी श्रेष्ठत्व सादृश्य
परिक्षण रे क्षणोक्षण
नारी अत्याचार चाले
आता करा सर्वोक्षण

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात ज्येष्ठ पत्रकार भुजंग उर्फ उत्तम कांबळे यांचा सत्कार

लातूर -श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर व्दारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राचार्य दालनामध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तथा बौद्धाचार्य भुजंग उर्फ उत्तम कांबळे यांचा प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते सत्कार केला.



यावेळी उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील, पर्यवेक्षक प्रा. नारायण गोरे, डॉ. टि. घनश्याम, प्रा. यज्ञेश जनगावे आणि माजी समाजकार्य विद्यार्थी धम्मपाल भुंगराव कांबळे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना भुजंग कांबळे म्हणाले की, मी सतत समाजातील दुर्बल, पिडीत, अन्यायग्रस्त घटकातील जनतेला न्याय देण्यासाठी संघर्ष केला असून अस्वच्छ सफाई कामगार, मेहत्तर भंगी, रुकी वाल्मिकी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक कार्य केले आहे. पत्रकार म्हणून गेल्या ४० वर्षापासून जनसेवेत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र शासनाने मला डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहिर केला आहे. त्याबद्दल त्यांनी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, सामाजिक न्यायमंत्री, सामाजिक न्याय राज्यमंत्री, लोकसभा सदस्य यांचे आभार मानले. हा सन्मान म्हणजे माझ्या सामाजिक कार्याची पावती आहे असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने समाजातील तळागाळातील गरीब, गरजू आणि वंचित घटकातील लोकांसाठी स्थानिक पातळीवर कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याची या पुरस्कारासाठी निवड केली हे ऐकून मनस्वी आनंद झाला. आपण माझ्या विद्यार्थ्यांचे पुरस्कार प्राप्त पालक आहात याचा मला सार्थ अभिमान आहे असे सांगून पुढील उज्वल वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा त्यांनी दिल्या.

# वरवंटी ग्रामपंचायतीला नळ कनेक्शन सरपंच केव्हा देणार ?

लातूर: वरवंटी ग्रामपंचायत हद्दीत येणारा परिसर म्हणजे माऊली नगर, राजमाता जिजामाता नगर, एकता नगर, परशुराम पार्क परिसर निळकंठेश्वर महाविद्यालया समोरील (बार्शी रोड) सर्व परिसरामध्ये अद्याप पर्यंत नळाचे कनेक्शन दिले गेलेले नाहीत. मे. साहेबांना विनंती करण्यात येते की, सदरील सर्व परिसर पाण्याच्या टँकरवरती अवलंबून आहे. दिवसेन दिवस पाण्याचे टँकरवाले बड्या भावाने पाणी देत आहेत.



यामुळे नागरिकांचे पाण्याच्या अवाजवी खर्चामुळे कंबरडे मोडत आहेत. साहेबांना विनंती की परिसरात तयार होणाऱ्या पाण्याच्या टाकीचे काम अत्यंत धिम्या गतीने होत आहे ही पाण्याची टाकी लवकरात लवकर तयार करावी. तसेच वरील नमुद केलेल्या परिसरात आपल्या ग्रामपंचायतीच्या वतीने पाण्याची पाईप लाईन टाकली आहे. सदरील पाईप पाईन टाकून दोन वर्ष होत आहेत असून पर्यंत परिसरात नळाचे कनेक्शन दिलेले गेलेले नाही.

आपण आपल्या स्तरावर सदरील बाबीकडे गांभीर्याने लक्ष घालून पाण्याचे नळ कनेक्शन संपुर्ण परिसरात म्हणजे राजमाता जिजामाता नगर, परशुराम पार्क, एकता नगर, वडगावे फार्म आदि ठिकाणी लवकरात लवकर नळ कनेक्शन देऊन पाणी सोडचाल ही अपेक्षा व्यक्त करायला हारकत नाही. अध्यक्ष प्रविण बामणकर, उपाध्यक्ष राचन्ना वांगी, सचिव दयानंद कलशेट्टी, कार्याध्यक्ष प्रविण साळुंके, कार्याध्यक्ष जयद्रथ शिंदे, विशाल भंडगे, संघटक प्रशांत गोरे, संघटक योगेश राठोड, मोहन गायकवाड, श्रीनिवास डुबणे, अविनाश गोखले, संकेत बामणकर, श्रीनिवास सरवदे, संतोष भोसले, आदित्य कोळी, ऋषिकेश सूर्यवंशी, ओम भंडगे, आदित्य भालेराव, निलेश राऊत, अभिषेक गायकवाड आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवा-मुंब्रा रेल्वे अपघातातील जखमींना मंत्र्यांची भेट, तातडीच्या उपचाराचे निर्देश; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून मृतांना श्रद्धांजली

ठाणे,(जिमाका):- दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकांदरम्यान



झालेल्या रेल्वे प्रवासी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, राज्याचे जलसंपदा (तापी, विदर्भ आणि कोकण) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, डॉ.नरेश म्हस्के, आमदार रवींद्र चव्हाण, निरंजन डावखरे आणि राजेश मोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींची भेट घेवून विचारपूस केली. यावेळी त्यांनी ठाणे व कळवा येथील रुग्णालयांना जखमींवर तातडीने उपचार करण्याचे निर्देश दिले. तसेच, या कठीण प्रसंगात शासन पूर्णपणे जखमी व त्यांच्या नातेवाईकांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही दिली.

या हृदयद्रावक दुर्घटनेतील मृतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी मृतकांच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचेही सांगितले.

या दुर्घटनेनंतर ठाणे जिल्हा प्रशासन संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याची माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली आहे. प्रशासनाकडून बचावकार्य आणि जखमींना मदत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. ही घटना कशी घडली, याबाबत चौकशी सुरू असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते श्याम दौंडकर लिखित 'धडपड भाग-३' या पुस्तकाचे प्रकाशन

पुणे : ज्येष्ठ पत्रकार श्याम दौंडकर लिखित धडपड भाग-३ या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृहात आयोजित पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात करण्यात आले.



पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला आमदार बापूसाहेब पठारे, आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जालिंदर कामटे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले, धडपड भाग तीन या पुस्तकाचे लेखक श्याम दौंडकर यांची एक रिक्षा चालकापासून ते जिल्हातल्या पत्रकारितेपर्यंतची वाटचाल नक्कीच खडतर होती. पत्रकार म्हणून त्यांनी अनेक वर्ष जिल्हा परिषद बीट सांभाळले असून त्यामुळे त्यांचा संपर्क वाढला, अनेक क्षेत्रातील लोकांशी त्यांचा संपर्क आला, जिल्ह्याचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या लेखणीतून समाजासमोर मांडले, ग्रामीण भागातील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ग्रामीण भागाची जाण असलेले पत्रकार म्हणून श्री. दौंडकर यांच्याकडे बघितले जाते. पुस्तक लिहीत असताना त्यांनी कोणतेही बंधन स्वतःवर घातले नाही, असे ते म्हणाले.

धडपड भाग-३ या पुस्तकात दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतच्या गाथा त्यांनी सर्वांच्या समोर ठेवण्याचा, उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत गरिबीतून ते पुढे आले असून त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर कष्टाच्या व संघर्षाच्या जोरावर पत्रकारितेसारख्या बुद्धिवंतांच्या क्षेत्रात स्वतःचे आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. श्री. दौंडकर यांनी समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या लेखणीचा वापर केला असून त्यातून त्यांनी लोकांचे प्रेम आदर सन्मान मिळविला आहे. पुस्तक लिखाणाबद्दल त्यांना जिल्ह्याच्या जनतेच्या वतीने शुभेच्छा देऊन श्री. पवार यांनी पुस्तकाच्या प्रकाशकांचे सुद्धा अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाच्या शेवटी धडपड भाग-३ पुस्तक देऊन मान्यवरांचा व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विशेष यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राजेंद्र खांदवे पाटील यांनी आभार व्यक्त केले.

## लाहोटी स्कूलच्या विश्ववर्धन चव्हाणचे जेईई ॲडव्हान्सड परीक्षेत यश

लातूर-राष्ट्रीय पातळीवर खखढ स्तरांच्या प्रतिष्ठित कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी झालेल्या जेईई ॲडव्हान्सड (JEE ADVANCED) परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून या परीक्षेत श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था संचलित राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांने घवघवीत यश मिळवून स्कूलच्या निकालाची परंपरा कायम स्कूलचा विद्यार्थी विश्ववर्धन वसंत चव्हाण याने (AIR-11333) गुण घेऊन स्कूल मधून प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. विश्ववर्धन चव्हाण या विद्यार्थ्याच्या यशाबद्दल श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, संस्था अध्यक्ष शैलेश लाहोटी, सचिव ॲड. आशिष बाजपाई,राजेंद्रकुमार मालपाणी, दिनेश इन्नाणी, शरदकुमार नावंदर, ईश्वर डागा, स्कूलचे चेअरमन आनंद लाहोटी, सूर्यप्रकाश धूत, चैतन्य भार्गव, प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु, रजिस्ट्रार प्रवीण शिवणीकर, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



# भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचे 'स्टॉकहोम कॉन्फरन्स'मध्ये उद्या भाषण स्वीडनमधील भारतीय समुदायासोबत संस्मरणीय संवाद

मुंबई : भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार सध्या स्वीडनमध्ये इंटरनॅशनल आयडिया स्टॉकहोम निवडणूक प्रामाणिकता परिषद (International IDE- Stockholm Conference on Electoral Integrity) या आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहण्यासाठी गेले आहेत. ही परिषद १० ते १२ जून २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. तेथे ज्ञानेश कुमार यांनी स्वीडनमधील भारतीय प्रवासी समुदायासोबत मनमोकळा व संस्मरणीय संवाद साधला.

या संवादादरम्यान त्यांनी भारताच्या निवडणूक आयोगाच्या समावेशात्मक सहभाग आणि नागरिक सजगतेवरील भर दिला. विशेषत: परदेशस्थित भारतीय (NRIs) आणि प्रवासी भारतीय नागरिक (OCIs) यांच्यासाठी आयोगाने घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. यात ऑनलाइन मतदार नोंदणी प्रणाली (Online Voter Registration System) व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून टपाल मतपत्रक व्यवस्थापन प्रणाली (Electronic Transmission of Postal Ballot Management System) सारख्या उपक्रमांचा समावेश आहे, जे परदेशस्थित मतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यास सुलभ करतात.

भारताच्या निवडणूक व्यवस्थापनातील नेतृत्वाची दखल घेत उद्या सुरु होणाऱ्या परिषदेमध्ये ज्ञानेश कुमार यांना उद्घाटनपर कीनोट भाषण देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. भारतीय निवडणुकांचा व्यापक व्याप, प्रचंड लॉजिस्टिक यंत्रणा व त्यातील व्यवस्थापन प्रणाली अनेक देशांच्या निवडणूक संस्थांना आकर्षित करत असते. सुमारे ५० देशांतील १०० हून अधिक प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होत आहेत. ही परिषद इंटरनॅशनल आयडिया (लोकशाही आणि निवडणूक सहाय्य (International Institute for Democracy and Electoral Assistance) या संस्थेद्वारे, स्वीडन परराष्ट्र मंत्रालय, स्वीडिश निवडणूक प्राधिकरण आणि ऑस्ट्रेलियन निवडणूक आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे.

परिषदेच्या पूर्वसंध्येला आज मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे इंटरनॅशनल आयडिया (International IDEA) चे महासचिव केविन कॅसस-झमोरा यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बैठक घेणार आहेत. त्यानंतर युनायटेड किंगडम, नेदरलँड्स, फ्रान्स, दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया, मेक्सिको, मंगोलिया, आणि स्वित्झर्लंड यांच्यासह सुमारे २० देशांच्या निवडणूक आयुक्तांशी द्विपक्षीय चर्चा होणार आहेत. या भेटी भारताच्या जागतिक लोकशाही सहकार्य आणि उत्तम सरावांच्या देवाण-घेवाणीत योगदान करतील.

या दौऱ्यात ज्ञानेश कुमार हे इंटरनॅशनल आयडियाच्या आशिया-पॅसिफिक विभागाच्या संचालिका श्रीमती लीना रिक्किला तमंग, नामिबियाच्या निवडणूक आयोगाच्या अध्यक्षा डॉ.एल्सी टी. न्गिकेंबुआ, आणि मॉरिशसचे निवडणूक आयुक्त अब्दूल रहमान मोहम्मद इर्फान यांच्यासोबतही संवाद साधणार आहेत.

ही स्टॉकहोम परिषद निवडणूक प्रक्रियेच्या प्रामाणिकतेसमोरील सध्याच्या आव्हानांवर विचारमंथन करण्यासाठी जगभरातील निवडणूक संस्थांचे प्रमुख, धोरणकर्ते आणि संस्थात्मक नेते यांना एकत्र आणते. डिजिटल गोंधळ, दिशाभूल करणारी माहिती, निवडणूक सुरक्षेची चिंता, हवामानाशी संबंधित जोखमी, आणि निवडणुकांमधील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका यांसारख्या मुद्द्यांवर चर्चेला या परिषदेत महत्त्व आहे.

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताने इंटरनॅशनल आयडिया सोबत दीर्घकाळचे सहकार्य राखले आहे. भारताचे निवडणूक आयोग व भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन संस्था (India International Institute of Democracy and Electoral Management) मार्फत जागतिक स्तरावर लोकशाही व निवडणूक व्यवस्थापनातील नवोपक्रमांचे नेतृत्व भारत करत आहे.

या दौऱ्यात ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळामध्ये आयआयआयडीइएम ($IIIDEM^2$) चे महासंचालक राकेश वर्मा, कायदा विभागाचे उपमहासंचालक विजय कुमार पांडेय, आणि मुख्य सचिव राहुल शर्मा यांचा समावेश आहे.

# मॉडेल सोलर व्हिलेज योजना

सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे. या योजनेविषयी ही माहितीष्ठ आपला भारत देश पर्यायाने महाराष्ट्र राज्य आणि राज्यातील गावे–घरे मोफत सोलर वीजेने ऊर्जावान करण्याचा संकल्प केंद्र व राज्य शासनाने केला आहे. अनेक नागरिक आपल्या निवासस्थानी सोलर यंत्रणा स्थापित करून वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याची अनेक उदाहरणे आपल्या सभोवताली दिसत आहेत. याच दिशेने आणखी एक पाऊल टाकत शासन 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने ९ ऑगस्ट २०२४ रोजी ज्ञापन प्रसिध्द केले आहे. त्यानुसार राज्यात ही योजना राबविण्याकरीता महाऊर्जा व महावितरणमार्फत प्रत्येक जिल्ह्यात एक गाव याप्रमाणे राज्यात २४ गावे महावितरण व १२ गावे महाऊर्जामार्फत 'मॉडेल सोलर व्हिलेज' म्हणून विकसित करण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांपैकी अमरावती जिल्ह्यातील एक गाव महाऊर्जामार्फत विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी अमरावती जिल्ह्यातील पाच हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत, अशी माहिती महाऊर्जाचे अमरावती विभागीय व्यवस्थापक प्रफुल तायडे यांनी दिली आहे.

पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत मॉडेल सोलर व्हिलेज या योजनेच्या संर्वागीण व्यवस्थापनासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती (उ्ड्ढउ) नुकतीच गठीत करण्यात आली असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे या समितीचे सदस्य असून विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

मॉडेल सोलर व्हिलेज योजनेसाठी गाव निवडीबाबत पुढीलप्रमाणे निकष केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय मंत्रालयाद्वारे निश्चित करण्यात आले आहेत. १) जिल्ह्यातील निवड केलेले गाव हे महसूल गाव असावे व त्याची लोकसंख्या जनगणनेनुसार किमान ५ हजारापेक्षा जास्त असावी. २) स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या गावांमध्ये स्पर्धेच्या कालावधी दरम्यान जास्तीत जास्त विविध अपारंपारिक ऊर्जा साधनेसौर उपकरणे आस्थापित करणे गरजेचे आहे. सौर उपकरणांमध्ये पी.एम. सुर्यघर योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवर सोलर रुफ टॉप प्रकल्प उभारणी करणे तसेच पी.एम. कुसुम योजनेंतर्गत जास्तीत जास्त सौरपंप अथवा इतर विकेंद्रीत अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प स्थापित करणे गरजेचे आहे. व या अनुषंगाने या सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता १० मेगा वॅट पर्यत असणे अपेक्षित आहे. ३) याकरीता सी.एस.आर.निधी, विभागाचा निधी किंवा जिल्हास्तरीय निधी व इतर उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करता येईल. ४) अग्रणी बँकेमार्फत वैयक्तिक लाभार्थ्याला सौर प्रकल्प उभारणीकरीता बँकेच्या पात्रता निकषानुसार कर्ज उपलब्ध होऊ शकेल. ५) स्पर्धेतील विजेत्या गावाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाऊर्जातर्फे तयार करण्यात येईल व प्राप्त होणाऱ्या एक कोटी एवढ्या केंद्रीय वित्तीय सहाय्यामधून गावाला पुढीलप्रमाणे गावातील कामे करता येतील.

गावासाठी सामुदायिक सौर प्रकल्प (बी.ई.एस.एस.) किंवा इतर प्रकल्प, एन आर एल एम बचत गटांसाठी विविध सौर प्रकल्प, गावातील शासकीय ईमारतींचे सौर विद्युतीकरण, सौर आधारित व इतर प्रकल्प, सौर कृषी पंप, इतर सौर अधारित तंत्रज्ञानावर असलेले अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प, बचत गटप्राथमिक स्तरावरील सहकारी संस्थाडेअरीमत्स्योद्योग प्रकल्प इत्यादी प्रकल्पासाठी ९० टक्के अर्थसहाय्य दिल्या जाणार आहे. या अनुषगांने निकषानुसार अमरावती जिल्ह्यातील पात्र असेलल्या गावांकडून १६ जून २०२५ पर्यत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. अधिकाधिक गावांनी पुढाकार घेऊन आपले गाव आदर्श आणि ऊर्जावान करावे. याबाबत अधिक माहितीसाठी महाऊर्जा विभागीय कार्यालय,अमरावती यांचा दुरध्वनीभ्रमणध्वनी क्र.०७२१ २६६१६१०८६६९९११०११ किंवा वोशवररीरींरींळऽारहरींीक्षर.लो या ईमेलवर संपर्क साधावा किंवा कार्यालयास प्रत्यक्ष भेट देण्यात यावी.

## फुटाणे आहेत अनेक समस्येवर रामबाण उपाय; जाणून घ्या फायदे



फुटाणे हि अशी गोष्ट आहे जे आरोग्यासाठी रामबाण औषध मानलं जातं, जे शरीराला अनेक फायदे देतं. फुटाण्यांमध्ये प्रथिने, आर्द्रता, कॅल्शियम, लोह, कार्बोहायड्रेटस आणि जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात आढळतात, त्यामुळ ते दररोज खाल्ल्यानं शरीराला फायदा होतो. खास गोष्ट अशी आहे की जर तुम्ही तुमच्या सकाळच्या नाश्त्यामध्ये फुटाण्यांसोबत गूळ किंवा मधाचं सेवन केलं तर ते तुमचं आरोग्य तर मजबूत करेलच शिवाय तुम्हाला अनेक आजारांपासून दूर ठेवेल. त्यामळं निरोगी व्यक्तीनं ५० ते ६० ग्रॅम भाजलेल्या हरभऱ्याचं सेवन करावं.

रोगप्रतिकार शक्ती मजबूत होते : फुटाणे खाल्ल्यानं शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. फुटाण्यांमध्ये पुरेशा प्रमाणात अँटी–ऑक्सिडंट गुणधर्म असल्यानं, ते शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. त्यामळे फुटाणे खाण्याचा सल्ला दिला जातो.

वजन कमी करण्यास उपयुक्त : फटाणे खाल्ल्यानं वजनही कमी होतं, कारण हरभर्यात फायबरचं प्रमाण जास्त असतं, ज्यामुळं शरीराची पचनक्रिया सुरळीत राहते, याशिवाय हरभरे खाल्ल्यानं शरीरात ऊर्जा राहते, त्यामळं वारंवार भूक लागत नाही. अशा परिस्थितीत भाजलेले हरभरे खाण्याचा सल्ला दिला जातो.

रक्तातील साखरेच्या रुग्णांसाठी फायदेशीर : ज्यांना रक्तातील साखरेची समस्या आहे त्यांच्यासाठीही फटाणे फायदेशीर आहे. जर तुम्ही सकाळी फटाणे खाल्ले तर रक्तातील साखरेच्या समस्या असलेल्या रुग्णांसाठी ते फायदेशीर ठरतं. त्यामुळे अशा रुग्णांना फुटाणे खाण्याचा सल्ला दिला जातो.

मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फायदेशीर : मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फुटाणे खाणे फायदेशीर आहे. फुटाणे कमी ग्लायसेमिक इंडेक्स (उघ) खाद्यपदार्थ असल्यामुळे, ते सर्व मधुमेही रुग्णांसाठी चांगले आहे. कारण इतर अन्नपदार्थ खाल्ल्यानं रक्तातील साखरेची पातळी वर–खाली होत असते, परंतु हरभऱ्याची जीआय पातळी केवळ २८ असते, त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी ते फायदेशीर आहे.

## लायन्स क्लबच्या जयपूर फूट शिबिरास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : लायन्स परिवार, लातूर, लायन्स क्लब सुप्रीम पुणे व लायन्स क्लब परभणी



मेन यांच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत कृत्रिम पायरोपण अर्थात जयपूर फूट शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सदर शिबीर लातूर शहरातील उद्योग भवन परिसरातील पी.व्ही. फिजिक्स क्लासेस येथे दि. ६ ते ८ जून २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. तर जयपूर फूटचे वितरण खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या प्रसंगी लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. मन्मथ भातांब्रे, समाज कल्याण दिव्यांगचे प्रमुख बसवराज पैके, लायन्स सुप्रीम पुणे चे रामेश्र्वर मणियार, लायन्स क्लब परभणीचे अध्यक्ष अवि टाक , शिबिराचे प्रकल्प प्रमुख पी. विवेकानंद , जगदीश हेड्डा, लायन्स परिवारातील अध्यक्ष डॉ.अजय नारायणकर , सुदर्शन कंजे , शरद मोरे, नागनाथ गित्ते, राहुल माळवदकर, पी. रामकृष्णा व लायन्स परिवारातील मान्यवरांची उपस्थिती होती. या शिबिरात १४० लाभार्थींनी आपला सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अशोक पांचाळ यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अश्र्विनी नारायणकर यांनी केले.

# महसुली विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी महसूल विभागाला बहुउद्देशीय वाहने - उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

पुण : नागपूर जिल्ह्यात महसूल विभागाला अत्याधुनिक बहुउद्देशीय (मल्टिपर्पज) वाहने देण्याचा निर्णय यापूर्वी शासनाने घेतला असून राज्यातील पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण महसूली विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणीदेखील यावर्षी अशी वाहने महसूल विभागाला देण्यात येतील, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

राज्यात पहिल्यांदाच पुणे जिल्ह्यात आयोजित केलेल्या महसूल लोक अदालतीच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार भीमराव तापकीर, बापूसाहेब पठारे, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, पक्षकार, वकील यांच्यासह दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

अधिकाऱ्यांकडून चांगल्या कामाची अपेक्षा करत असताना त्यांनाही पायाभूत सुविधा पुरविल्या पाहिजेत, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, त्यादृष्टीने पहिल्या टप्प्यात सर्व विभागीय आयुक्तालयांच्या ठिकाणी आणि त्यानंतर टप्प्या–टप्प्याने इतर जिल्ह्यांतील महसूल विभागाला वाहने उपलब्ध करून दिली जातील.

आजच्या महसूल अदालतीत जवळपास ११ हजार महसूली दावे तडजोडीने निकाली निघणार असल्याने महसूल विभाग आणि न्याय व्यवस्थेवरीलही ताण कमी होणार आहे. पुढील अनेक वर्षे चालणारे खटले थांबणार असून त्यातून जनतेच्या आणि प्रशासनाच्या वेळेची, पैशाची आणि श्रमाची बचत होणार आहे. वाद संमतीने किंवा तडजोडी मिटल्याने गावातील भांडणे संपतील, जमिनीच्या वादामुळे कलुषित झालेली मने स्वच्छ होतील. घरात, गावात शांततेचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होईल. उर्वरित २० हजार दावेही अशा महसूल अदालतीचे आयोजन करुन तडजोडीने निकाली काढावेत, असेही ते म्हणाले.




प्रशासन आपली जबाबदारी बजावत असताना जे गुन्हेगारीवृत्तीने काम करतात अशांविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मकोका) कारवाई केली पाहिजे. त्यादृष्टीने कायद्यात बदल करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

शासनाचे जे विभाग अधिकाधिक महसूल शासनाच्या तिजोरीत आणतील त्यांना त्याप्रमाणात प्रोत्साहन निधी देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती श्री. पवार यांनी दिली. राज्य शासनातर्फे विविध भव्य शासकीय इमारती उभारण्यात येत आहेत. यशदा येथे मसुरीच्या धर्तीवर राज्यातील अधिकाऱ्यांसाठी देशात इतर कोणत्याही राज्यात नसेल असे भव्य प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १२० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहितीदेखील उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

पुण्यात सुरू केलेला महसूल लोकअदालत उपक्रम राज्यात राबविणार – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे पुणे जिल्ह्याने सुरू केलेल्या महसूल लोक अदालतीमुळे महसुली दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात निकाली निघणार आहेत. त्यामुळे ही सर्वसामान्यांना न्याय देणारी महसूल लोकअदालतीची मोहीम यापुढे राज्यभरात राबविली जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.

पुणे येथे भरलेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील ६ विभागीय आयुक्तांना महसूल विभागाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने काही जबाबदाऱ्या दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यात नायब तहसील ते मंत्रालय पातळीवर तीन ते साडेतीन लाख महसूली दावे प्रलंबित आहेत. ही मोठ्या प्रमाणावरील प्रकरणे कशी संपतील यासाठी महसूल लोक अदालतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच पक्षकार आणि वकीलांचे सहकार्य घेण्यात येईल.

महसूल विभाग हा राज्याचा चेहरा आहे. वेळ आणि पैशाची बचत, मैत्रीपूर्ण न्यायव्यवस्था निर्माण करण्याकरिता, स्वखुशीने तडजोड निर्माण करण्याची व्यवस्था, महसूल व्यवस्थेवरील ताण कमी करणे आदी काम या महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून झाले आहे. महसूल विभागात मोठ्या प्रमाणात पारदर्शकता आणण्यात येत आहे. विभागातील मागील २५ वर्षापासून प्रलंबित असलेले विषय शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्याने सादरीकरण केलेल्या बाबींच्या अनुषंगाने विविध शासन निर्णय काढण्यात येणार असून त्यामुळे राज्याच्या महसुलात २० हजार कोटींची वाढ होईल. ई–फेरफार प्रणालीच्या अनुषंगाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्रकाचे राज्यभरात अभिनंदन झाले असून या परिपत्रकाप्रमाणे अंमलबजावणीसाठी शासन निर्णय करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

राज्य शासनाने नवीन वाळू धोरण आणले असून 'एम–सँड'म्हणजेच दगडापासून केलेली वाळू बांधकामात वापरली जाईल. त्यादृष्टीने शासकीय, खासगी जागा उपलब्ध करून देऊन क्रेशर उभारण्यात येतील. महाखनिजच्या माध्यमातून ऑनलाईन संनियंत्रण करून मागणीप्रमाणे वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. जेणेकरून बुडणारा महसूल वाचण्यासह नदीच्या वाळूवरुन होणारे गैरप्रकार बंद होणार आहे.

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व' अभियानासाठी ज्याप्रमाणे जिल्हा वार्षिक योजनेतून निधी दिला त्याप्रमाणे महसूल लोक अदालतीला द्यावा, महसूल विभागाला अत्याधुनिक मल्टीपर्पज वाहने मिळाल्यास विभागाच्या कामाला गती येईल, असेही ते म्हणाले.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी यांनी महसूल लोक अदालतीच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. ते म्हणाले राज्यातील मोठ्या प्रमाणात प्रलंबित महसूल प्रकरणांबाबत उपाययोजना करण्याच्या मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने पुढाकार घेऊन ही लोक अदालत आयोजित केली आहे. जिल्ह्यात मंडल अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, अपर जिल्हाधिकारी स्तरावर ३१ हजारावर महसूली प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी ११ हजार ५८९ प्रकरणे या अदालती मध्ये ठेवण्यात आली आहे. यापुढेही दर तीन महिन्यांनी महसूल लोक अदालतीचे आयोजन करून दाव्यांची संख्या ३१ हजारावरून १० हजारापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या ईक्यूजे कोर्ट, ई– हक्क प्रणाली, ई– फेरफार नोंदणी, पानंद रस्ते खुले करण्याची मोहीम, नाविन्यपूर्ण असा सेवादूर उपक्रम आदींची माहिती दिली. महाखनिज व बांधकाम परवानगी एकात्मिक प्रणालीवर आणल्यामुळे १५० कोटी रुपयांच्या महसूलात वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महसूल लोक अदालतीत निकाली निघालेल्या प्रकरणातील पक्षकारांना प्रातिनिधीक स्वरुपात निकालपत्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी वकील आणि पक्षकार यांनी प्रातिनिधीक स्वरुपात मनोगत व्यक्त केले.

अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी आभार व्यक्त केले.

## राशिभविष्य १० जून २०२५

मेष : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर

योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

वृषभ : शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा:दक्षिण

कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामन्य राहील.

मिथुन: शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: उत्तर

कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

कर्क: शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व

महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

सिंह : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: दक्षिण

आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल. जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका. ईश्वराविषयी श्रद्धा वाढेल.

कन्या : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:दक्षिण

समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल. घर, जमीन विकत घेण्याचा योग आहे. डोळ्याचा आजार संभावतो.

तुळ : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर

कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

वृश्चिक : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व

शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाईट व्यसनांपासून दूर रहा. प्रवास टाळा.

धनु : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व

फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील. आळस करू नका.

मकर : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर

शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा. पारिवारीक समस्या सुटतील. प्रवास सुखकारक होईल.

कुंभ : शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व

व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

मीन : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: उत्तर

अडकेलेली कामे वेळेत पूर्ण होण्याची शक्यता. विरोधक त्रासून जातील. धन मिळण्याचे योग आहेत. प्रवास सुखकारक होणार नाही. धैर्य व संयम बाळगा.

## इतिहासात आजचा दिवस १० जून २०२५

अंतरराष्ट्रीय

२००६ – ऐतिहासिक दांडी मार्गाला सरकारने राष्ट्रीय ठेव्याचा दर्जा दिला.

२००६ – आंध्र प्रदेशच्या महबुबनगर जिल्ह्यातील पोलकापल्ली गावात दोन गटात झालेल्या आपसातील वादातून एकाच कुटुंबातील १३ जणांना जिवंत जाळले.

२००७ – मणिपुरमध्ये जातीय हिंसाचारात १५ ठार.

२००७ – आयफामध्ये 'रंग दे बसंती' ला उत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार.

२००७ – आशियाने आफ्रो–आशिया चषक ३–० ने जिंकला.

राष्ट्रीय

२००८ – मुंबईसह महाराष्ट्रात मराठी पाट्या असाव्यात या मागणीला महाराष्ट्र सरकारने हिरवा कंदील दाखवला.

जन्म

१९०८ – जनरल जयंतनाथ चौधरी, भारतीय लष्करप्रमुख.
१९३८ – राहुल बजाज, भारतीय उद्योगपती.

निधन

२००६ – सपा नेते अरविंद यादव यांचे अपघाती निधन
१९०३ – लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितज्ञ.
२००१ – फुलवंतीबाई झोडगे, सामाजिक कार्यकर्त्या.
२००७ – क्रिकेटपटू सुभाष दिक्षितची आत्महत्या.

## सप्तकुंडमध्ये पर्यटकांवर मधमाशांचा कहर; २०० हून अधिक जखमी!

छत्रपती संभाजीनगर–प्रसिद्ध अंजिठा लेण्यांजवळील सप्तकुंड धबधबा बघायला आलेल्या पर्यटकांवर मधमाशांनी अचानक हल्ला चढवला. बकरी ईदची सुट्टी आणि शनिवार–रविवारचा योग साधून मोठ्या संख्येने पर्यटक येथे जमले होते. पण दुपारी अचानक मधमाशांच्या थव्याने गर्दीवर हल्ला केल्याने एकच अफरातफरी माजली.

या हल्ल्यात तब्बल २०० हून अधिक पर्यटक जखमी झाले असून, अनेकांना तातडीने वैद्यकीय मदत द्यावी लागली. विशेष म्हणजे, गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात मधमाशांच्या हल्ल्याचे प्रकार वारंवार घडत आहेत.

पर्यटनस्थळ असूनही सुरक्षेच्या बाबतीत पुरेशा उपाययोजना न केल्यामुळे पर्यटकांमध्ये नाराजी आहे. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी आता होत आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894